# B.K. BIRLA CENTRE FOR EDUCATION
SARALA BIRLA GROUP OF SCHOOLS
A CBSE DAY-CUM-BOYS' RESIDENTIAL SCHOOL

## ANNUAL EXAMINATION(2025-26)
### MARATHI – SET- B

| | |
|---|---|
| Class : IX | Duration : **3** Hrs |
| Date : .2.2026 | Max. Marks : **80** |
| Admission No.: | Roll No.: |

---

कृतिपत्रिकेसाठी सूचना :
(1) या प्रश्नपत्रिकेत अ, ब, क, ड असे चार विभाग आहेत.
(2) सर्व विभाग आवश्यक आहेत.
(3) यथाशक्य सर्व विभागाची उत्तरे क्रमाने यावीत.
(4) एकाच विभागातील सर्व प्रश्नांची उत्तरे क्रमानेच यावीत.

---

## विभाग (अ) वाचन व आकलन गुण (15)

**प्र 1 (आकलन ) अपठित पद्यांश :–**

**प्र 1 (अ) खालील कविता काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :–**

माझी भाषा माझी आई अर्थ भावनांना देई
तिच्या राहावे ऋणात होऊ नये उतराई
तिच्या एकेका शब्दाला रत्न कांचनाचे मोल
कधी तप्त लोहापरी कधी चांदणे शीतल
रानवाऱ्याच्या गंधात माझी मराठी भिजली
लेऊनिया नाना बोली विविध माझी मराठी सजली
माझ्या भाषेचे अमृत प्राशेल तो भाग्यवंत
तिचा नाही दुजाभाव असो कोणताही पंथ
माझ्या मराठी भाषेची काय वर्णावी थोरवी
दूर देशी ऐकू येते माझ्या मराठीची ओवी

**प्र 1 (अ) कविता वाचून त्यावर आधारित प्रश्नांच्या उत्तरांचा योग्य पर्याय निवडा :–(कोणतेहीचार(4X1=4)**

1 कवीने कोणत्या गोष्टीची तुलना आईशी केली आहे?
- **अ** देशाशी **ब** भाषेशी
- **क** निसर्गाशी **ड** ज्ञानाशी

2 कवीच्या भाषेत शब्दांचे मोल कशासारखे आहे?
- **अ** सोन्यासारखे **ब** रत्न–कांचनासारखे
- **क** पैशासारखे **ड** मोत्यासारखे

3 मराठी भाषेत कोणते घटक मिळून सजले आहेत?
- **अ** विविध ऋतू **ब** नाना बोली
- **क** अनेक पंक्ती **ड** विविध रंग

4 मराठी भाषेचे अमृत प्राशन करणारा कोण ठरतो?
- **अ** ज्ञानी **ब** श्रीमंत
- **क** भाग्यवंत **ड** पराक्रमी

5 मराठी भाषा कोणत्या गंधात भिजली आहे ?
- **अ** रानवाऱ्याच्या **ब** उन्हांच्या
- **क** पावसाच्या **ड** हिवाळयाच्या

**प्र 1 (ब) एका वाक्यात उत्तरे लिहा :–(कोणतेही तीन)** **(3X1=3)**

**1** मराठी भाषेची थोरवी कोठे ऐकू येते?

**2** मराठी भाषेचा चांदण्यासारखा कोणता गुण कवितेत नमूद केला आहे?

**3** कवितेनुसार मराठी भाषा कोणत्या प्रकारचे ज्ञान देते?

**4** कवीने मराठी भाषेला कोणत्या स्वरूपात गौरविले आहे?

5 उपकार या शब्दासाठी कवितेत आलेला समानार्थी शब्द शोधून लिहा.

**प्र 2 :– (आकलन ) अः अपठित गद्यांश :–**

संत साहित्यामध्ये ज्यांचा वारंवार उल्लेख आढळतो,ते दोन पक्षी म्हणजे चातक आणि चकोर. दोन्ही पक्ष्यांमध्ये एक समान दुवा आहे तो म्हणजे वाट पाहणे. चातक पक्षी पावसाळी ढगाची वाट पाहतो,तर चकोर पौर्णिमेच्या चंद्राची वाट पाहतो. चकोर पक्षी पौर्णिमेच्या चंद्रकिरणांवर जगतो असा कविसंकेत आहे. चंद्राबद्दलची त्याची ओढ प्रसिध्द आहे. संतकाव्यात चकोराची उपमा देऊन संत परमेश्वराबद्दलची त्यांची ओढ व्यक्त करतात. हा चकोर पक्षी खरोखरच चंद्रकिरण खातो का? याचे उत्तर नाही असेच येते. मुळात प्रकाश ही खाण्याची किंवा पिण्याची गोष्ट नाहीच.

काही पक्षी संशोधकांनी केलेल्या संशोधनात हे स्पष्ट झाले आहे,की चकोर पक्षी रात्रीच्या वेळी आपले अन्न मिळविण्यासाठी बाहेर पडतो. चांदण्या रात्री तो आपले भक्ष्य म्हणजे कीडे,कीटक चोच वर करून पकडण्याचा प्रयत्न करतो.त्याची ही कृती कवीमनाला चांदणे पिण्यासारखी वाटली असू शकेल. पारंपारिक कथांनुसार चातक पक्षी स्वाती नक्षत्रातील पावसाचे जमिनीवर न पडलेले पाणी वरच्यावर पितो आणि आपली तहान भागवतो. एखादयावर आपले जीवन अवलंबून असणे किंवा एखादयाची वाट पाहणे यासाठी चातक आणि चकोराची उपमा दिली जाते.

**प्र 2 (अ) खालील प्रश्नांची उत्तरे पर्यायामधून निवडाः–(कोणतेही पाच)** **(5X1=5)**

**1** कोणत्या साहित्यात पक्ष्यांचा उल्लेख आला आहे ?

**अ** संत **ब** पंत

**क** गदय **ड** पदय

**2** चातक पक्षी कशाची वाट पाहतो?

**अ** पाण्याची **ब** आकाशाची

**क** पावसाळी ढगांची **ड** पावसाळी गारांची

**3** चकोर पक्षी कशाची वाट पाहतो?

**अ** सूर्यकिरणांची **ब** मेघाची

**क** अन्नाची **ड** चंद्रकिरणांची

4 संतांच्या मनात कोणाबद्दल ओढ असते?

**अ** आई **ब** परमेश्वर

**क** देवालय **ड** ग्रथसंपदा

**5** चकोर पक्षी अन्न मिळविण्यासाठी केव्हा बाहेर पडतो?

**अ** दुपारी **ब** सायंकाळी

**क** पहाटे **ड** रात्री

**6** संतसाहित्यामध्ये कोणत्या दोन पक्ष्यांचा उल्लेख आला आहे?

**अ** चातक व चकोर **ब** हंस व बगळा

**क** चिमणी व कावळा **ड** कबूतर व कोकिळा

**प्र 2 (ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :–(कोणतेही तीन)** **(3X1=3)**

**1** चातक आणि चकोराची उपमा कोणाला दिली आहे?

**2** पारंपारिक कथांनुसार चातक पक्ष्याबाबत कोणता समज आहे?

**3** चकोर पक्ष्याबाबत कोणता कविसंकेत आहे?

**4** चकोर पक्षी आपले भक्ष कसे पकडण्याचा प्रयत्न करतो?

## विभाग :– ब ( 20 गुण)

**प्र 3 (अ) शब्दांच्या जाती ओळखा :– (कोणतेही चार)** **(4X1=4)**

**1** प्रत्येकामध्ये खरेपणा असावा. **(भाववाचक नाम ओळखा)**

**2** ते,तो,ती,हा,ही हे या शब्दांना व्याकरणातील शब्द जातीत काय म्हणतात.

**3** उत्तम शिक्षकांचे आपल्यावर फार उपकार आहेत. **(अधोरेखित शब्दाची जात ओळखा)**

**4** विदयार्थी मैदानावर आले आणि पाऊस सुरू झाला . **( उभयान्वयी अव्यय ओळखा)**

**5** मीरा मधुर गाते. **( आधोरेखित शब्दाची जात ओळखा)**

**प्र 3 (ब) काळ ओळखा व बदला ( कोणतेही तीन)** **(3X1=3)**

**1** शबरीने रामाच्या पायाचे ठसे पाहिले होते.**( वर्तमानकाळातील वाक्य तयार करा).**

**2** प्रीती दिलेले काम पूर्ण करेन. **( भूतकाळातील वाक्य तयार करा)**

**3** दिक्षा दररोज कार्यालयात जात असे. **( भविष्यकाळातील वाक्य तयार करा )**

**4** शामभाऊ फार प्रसिद्ध गायक होते.**(काळ ओळखा)**

**प्र 3 (क) वाक्याचे प्रकार ओळखा ( कोणतेही तीन)** **(3X1=3)**

**1** तू वाचन करायला पाहिजे. **( आज्ञार्थी वाक्यात रुपांतर करा)**

**2** त्याच्या बोलण्यात खोटेपणा नव्हता.**( होकारार्थी वाक्यात रुपांतर करा )**

**3** मला ती कादंबरी आवडली. **( वाक्य प्रकार ओळखा)**

**4** अबब! काय ही गर्दी . **( विधानार्थी वाक्यात रुपांतर करा)**

**प्र 3 (ड) समानार्थी शब्द ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

**1** खालील पैकी गटात न बसणारा शब्द कोणता?

**1** नदी **2** सागर
**3** सरिता **4** तटिनी

**2 विदयालय** शब्दासाठी समानार्थी शब्द लिहा.

**3** खालील पैकी गटात न बसणारा शब्द कोणता?.

**अ** तरू **ब** रत्नाकर
**क** झाड **ड** वृक्ष

**प्र 4 (अ) विरुध्दार्थी शब्द ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

**1** पवित्र × 2 मालक × 3 आदर ×

**प्र 4 (ब) लिंग बदला ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

**1** खालील पैकी पुल्लिंगी शब्द कोणता?

**अ** स्त्री **ब** विनंती
**क** कोलाहल **ड** कला

2 **बैल** या शब्दासाठी स्त्रीलिंगी शब्द कोणता ?

3 **उंट** या शब्दासाठी स्त्रीलिंगी शब्द कोणता ?

**प्र 4 (क) वचन बदला ( कोणतेही दोन)** **(2X1=2)**

**1** खालील पैकी **अनेकवचनी शब्द** कोणता ?

**अ** घर **ब** डोळे
**क** ताट **ड** दार

**2** खालील पैकी **एकवचनी शब्द** कोणता ?

**अ** फुले **ब** झोपडया
**क** फेटे **ड** बादली

**3 गाय** शब्दाचे वचन बदला.

**प्र 4 (ड) समास ओळखा ( कोणतेही दोन) (2X1=2)**

**1** प्रतिकार

**2** खालीलपैकी समास प्रकाराच्या आधारे गटात न बसणारा शब्द कोणता?

**अ** तीनचार **ब** खरेखोटे **क** पापपुण्य **ड** त्रिकोण

**3** त्याने **घरदार** खरेदी केले. ( अधोरेखित शब्दाचा समास ओळखा)

**विभाग–क पाठयपुस्तक आधारित (30 गुण)**

**प्र 5 (अ) एका वाक्यात उत्तरे लिहा (कोणतेही तीन) (3X1=3)**

**1** शिरीष वडीलांना कोणत्या नावाने हाक मारत असे ?

**2** लेखकाच्या शाळेची बाग कोठे होती ?

**3** आफ्रिका खंडात एडिसन यांना कोणत्या रोगाचा सामना करावा लागला ?

**4** ऑलिंपिक सामने दर किती वर्षांनी होतात ?

5 हेललने कशाचे तुकडे–तुकडे केले ?

**प्र 5 (ब) रिकाम्या जागी योग्य शब्द भराः– (कोणतेही तीन) (3X1=3)**

**1** नाना एके काळी उत्कृष्ट –––––– होते.

**2** वॉटर हा शब्द शिकण्यासाठी बाईंनी हेलनला –––––नेले.

**3** आजीचे वय वर्षे ––– होते.

**4** फसलेल्या प्रयोगातूनही नंतर प्रयोग करणाऱ्याचे –––––– वाचतात.

5 सुरूवातीला ––––– रूपये इनाम ठेवण्यात आले.

**प्र 5 कः– खालीलपैकी कोणत्याही <u>एका</u> प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहाः– (1X3=3)**

**1** ॲनी सुलिव्हॅन नसत्या तर हेलन घडली नसती या विधानाची सत्यता पटवून दया–

**2** सखू आजीचे व्यक्तिचित्र रेखाटा .

**3** संशोधक होण्यासाठी तुम्ही स्वतःच्या व्यक्तिमत्वात कसे बदल कराल ते लिहा –

**प्र 5 डः–खालील वाक्यांतील वाक्प्रचार ओळखा व त्याचा अर्थ कंसातील कोणत्या वाक्प्रचाराशी जुळतो ते लिहाः– (5X1=5)**

**(मनावर कोरले जाणे, हकालपट्टी करणे, उसंत न लाभणे, भिकेला लागणे, ताब्यात घेणे )**

**1** परीक्षा जवळ आली की मैदानावर जायला मला वेळ मिळत नाही.

**2** शिवरायांनी मुगलांच्या ताब्यातील अनेक गडांवर कब्जा केला.

**3** बॅकेचे कर्ज फेडता–फेडता रामराव दरिद्री झाला.

**4** वर्गात सुप्रीत खूप दंगा करत असल्यामुळे सरांनी त्याला वर्गातून बाहेर काढले.

**5** विश्वास नांगरे पाटील यांच्या भाषणातील काही वाक्ये माझ्या मनावर प्रतिबिंबीत झाली.

**प्र 6 अ :– (अ) एका वाक्यात उत्तरे लिहाः– ( कोणतेही चार ) (4X1=4)**

**1** वारकरी संप्रदायाचा पाया कोणी रचला ?

**2** व्यायाम आपला कसा मित्र आहे ?

**3** दुरंगी चुनरीत कोण उभी आहे ?

**4** झोळी कोठे टांगली आहे ?

**5** पुन्हा एकदा काय चमकावी असे कवीला वाटते ?

**प्र 6 (ब) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :–(कोणतेही चार) (4X1=4)**

**1**––––– करण्या वसंत ऋतूचे.

**2** राघू ––––– हाकते ढग बरसते.

**3** तुका झालासे ––––– .

**4** व्यायामे वाढे –––––––.

**5** काटा पायात रूततो ––––– रगत सांडते.

**प्र 6 क) खालील काव्यपंक्तींचे संदर्भासहित स्पष्टीकरण करा:—(कोणतेही एक) (1X3=3)**

1 पुन्हा एकदा
घालीत पिंगा
पावसाच्या सरी
व्हाव्यात बेभान
कोसळाव्या खाली
मातीत माती व्हावी एक

**किंवा**

व्यायामे जडत्व जाई दूरी। व्यायामे अंगी राहे तरतरी।
रक्तव्यवस्था उत्तम शरीरी । वाढे विचारी सजीवपणा।।

**प्र 7 अ स्थूलवाचन :— एका वाक्यात उत्तरे लिहा :— ( कोणतेही पाच ) (5X1=5)**

1 पुच्छविहिन वानराचे नाव काय होते?
2 मराठी विश्वकोशाचा पहिला खंड केव्हा प्रकाशित झाला ?
3 आसामची भूमी कशी आहे ?
4 केशभूषेचा मुख्य उद्देश कोणता ?
5 शब्दकोडयासाठी सर्वात सोईस्कर भाषा कोणती ?
6 आत्ता पर्यंत विश्वकोशाचे किती खंड प्रकाशित झाले ?

**विभाग— ड लेखन— (गुण 15)**

**लेखन**

**प्र 8 (अ) दिलेले निबंध मुद्दे व कथा मुद्दे नीट वाचा व दिलेल्या पाच विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर 120 ते150 शब्दांत निबंध अथवा कथा लिहा :— (कोणतेही एक) (1X5=5)**

**निबंधविषयक मुद्दे**

**1 पृथ्वी बोलू लागली तर ......!**

**मुद्दे :—** मी पृथ्वी——— भव्यता ——— सर्व काही ———मानव, झाडे, झुडपे, पशु—पक्षी ———समुद्र ——— आनंदी आनंद ———स्वार्थी मानव——— पृथ्वीचा फायदा घेणे——— निसर्गास हानी ———परिणाम.

**2 शालीची आत्मकथा**

मुद्दे:—प्रवासात थंडी———अंगावर शाल———शाल बोलत होती——— शालिची निर्मिती कोठे व कधी———तुझ्या बाबांच्या सत्कारामुळे घरी आले———आता जीर्ण——— तुझी आई मला जपायची———तुझ्याकडे आले ——— आता तू माझी काळजी घे.

**3 आवडता ऋतू**

मुद्दे :—आवडत्या ऋतूचे नाव——कोणत्या महिन्यात असतो———वातावरणात त्यामुळे होणारे बदल——तुम्हाला आवडण्याची कारणे

**किंवा**

**कथाविषयक मुद्दे. (शीर्षक आणि तात्पर्य आवश्यक)**

1 एक वृध्द शेतकरी———शेतात आंब्याची रोपे लावणे———राजाचे आगमन——— शेतकरी व राजा यांच्यात संवाद—— या झाडांची फळे तुला कशी खायला मिळणार——— राजाचा प्रश्न——शेतकऱ्याचे उत्तर ———माझ्या पुढच्या पिढीला खायला मिळतील——— माझ्या पूर्वजांनी झाडे लावली म्हणून मी खातो——शेतकऱ्याच्या उत्तराने राजाला आनंद ———शेतकऱ्याला बक्षीस, ——तात्पर्य .

2 एक फुलांचे गाव —— एक दगडांचे गाव—— दगडांना फुलांचा राग——फुलांचीच स्तुती——दगडांना किंमतच नाही——एकदा दोन्ही गावात भांडण——फुलांवर हल्ला——फुले ठेचली जातात——तरी त्यांचे हास्य——दगडांना आश्चर्य—— फुलांचे उत्तर—— जितके अधिक चिरडता तितका सुगंध पसरतो——तात्पर्य.

**प्र 8 (ब) पत्र लेखन :– ( लिफाफा आवश्यक) ( कोणतेही एक )** **(1X5=5)**

प्रज्ञेश / प्रज्ञा रसाळ,क्रीडा प्रतिनिधी,सरस्वती विदयालय,टिळक रोड,पुणे–400112 हा / ही शाळेच्या क्रीडा विभागासाठी क्रीडा साहित्य मागवणारे पत्र मा. व्यवस्थापक, ईवर स्टोअर ,पुणे यांना लिहित आहे.

**किंवा**

रिया / रजत प्रधान, विदयार्थी प्रतिनिधी,नेहरू विदयालय,छत्रपती शिवाजी रोड,पुणे– 765432 ही / हा शाळेच्या मैदानावर केलेल्या अतिक्रमणाबाबत तक्रार करणारे पत्र मा. प्रकाश मोरे, नगरसेवक ,महानगरपालिका, पुणे यांना लिहित आहे.

**प्र 8 (क) खालील दिलेल्या विषयावर जाहिरात लेखन कराः–** **(1X5=5)**

**1** मराठी सुलेखन वर्गासाठी एक जाहिरात तयार करा–

**2** सायकलच्या दुकानाची जाहिरात तयार करा :–

**:::::::::::::::::::::: समाप्त ::::::::::::::::::::::::::**